
MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue March 2018

Vidyawarta®

International Multilingual Research Journal

# Literature and Social Issue



Editor

Dr.Ganpat Gatti
Dr.Nirmala Padmawat
Dr.Nandkumar Kumbharikar

# || Index ||

01) "INTRODUCTION TO VEDIC MATHEMATICS"
**Garud Sham Baliram** || 07

02) Clash of Ideologies in The Judgment of Indra
**Jadhav N. S.** || 15

03) Nashik Copper-plate inscription
**Dr Bhong Ramdas Gundiba** ||22

04) The current scenario of employment generation in .......
**Kailas Dharma Landge,** || 24

05) NEED OF CYBER CRIME EDUCATION
**Mr. Machindra K. Wakchaure** || 30

06) Diversity of fresh water fishes of Dudhna river from .......
**Ravi G. Pradhan** || 35

07) "Important Era's of Indian Movies"
**Dr. Ganpat Gatti** || 38

08) "INTRODUCING GST AND ITS IMPACT ON INDIAN ECONOMY"
**Prof. Khushbu Purswani Jetho** || 41

09) Brief of English Literature
**Ku. Meghna Hemraj Joashi** || 49

10) "Brief History of African-American Literature"
**Dr. Nirmala S. Padmavat** || 51

11) स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाचा ऐतिहासिक अभ्यास
**डॉ. राधाकृष्ण ल. जोशी, प्रा.शेख हुसेन इमाम** || 55

12) विमुद्रीकरणाचे कृषी क्षेत्रावर होणारे परिणाम
**प्रा. डॉ. बी. एस. मुजमुले** || 57

13) कला व साहित्य
**प्रा.डॉ. शरद ल. नागरे** || 59

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.62759
Vidyawarta®
March 2018 Special Issue


11

# स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाचा ऐतिहासिक अभ्यास

**डॉ. राधाकृष्ण ल. जोशी,**
इतिहास विभाग प्रमुख,
गांधी महाविद्यालय, कडा जि.बीड

**प्रा.शेख हुसेन इमाम**

*********

**प्रस्तावना :-**

ब्रिटीशांनी भारतावर दोनशे वर्ष राज्य केले. ब्रिटीशांची गुलामगिरी हा भारतीयांच्या सामाजिक मागासलेलपणाचा, तसेच जागृतीचा अभाव, राष्ट्रवादी भावनेचा अभाव याचा परिपाक होता असे म्हणणे संयुक्तिक ठरेल. परंतु या सर्व समस्यांवर मात करून भारतीयांनी ब्रिटीशांविरुध्द लढा उभारला. हा लढा भारतीयांनी अहिंसात्मक मार्गाने दिला. या दृष्टीकोनातून भारतीय स्वातंत्र्यलढा हा जगातील सर्वात मोठा लढा, सर्वात मोठी लोकचळवळ होती. या चळवळीत लाखो स्त्री-पुरुष, जात-पात यांचा कुठलाही विचार न करता भारतीयांना ब्रिटीशांची गुलामगिरी झुगारून देण्याचा प्रयत्न केला. याच कारणास्तव साम्राज्यवादी ब्रिटीश राजसत्तेला भारतातून परतावे लागले. या चळवळीतील भारतातील स्त्री-पुरूषांनी विशेषत: स्त्रियांनी दिलेले योगदान उल्लेखनिय स्वरूपाचे आहे. परंतु त्यांच्या योगदानाचा इतिहास मात्र विस्तृत स्वरूपात सादर करण्यात आला नाही. परंतु भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांचा सहभाग उल्लेखनिय स्वरूपाचा आहे. त्याचा मागोवा घेण्याच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत शोधनिबंधाची उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

१) भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा आढावा घेणे.

२) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाचे अध्ययन करणे.

३) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या कामगिरीचे विश्लेषण करणे.

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधीजींच्या नेतृत्वात डॉ.ॲनी बेझंट, सरोजिनी नायडू यासारख्या महिलांनी उल्लेखनिय कार्य केले आहे. याबरोबरच लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वात देखील स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीच्या कार्यक्रमांमध्ये बंगाल व महाराष्ट्रातील अनेक स्त्रिया सामिल झाल्या होत्या. अशा प्रकारच्या मुंबई, कलकत्ता, मद्रास आणि आसाम-ओरिसा या प्रांतातील स्वातंत्र्य चळवळीतील सहभागी महिलांचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

**१) मुंबई**

भारताच्या स्वातंत्र्यचळवळीतील मुंबई व महाराष्ट्रातील अनेक स्त्रियांनी आपला सक्रिय सहभाग नोंदविला. मुंबई प्रांतात प्रामुख्याने सरोजिनी नायडु आणि अवंतिका गोखले यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय स्त्री संघ कार्य करीत होता. इ.स.१९३० साली स्थापन झालेल्या 'देशसेविका' संघात पेरींग कॅप्टन, हौसा मेहता, जयश्री रामजी, अवंतिकाबाई गोखले, कृष्णाबाई घुमटकर, यशोदाबाई भट यांनी उल्लेखनिय कार्य केले. याच वर्षी १९३० सालीच डॉ.ना.स.हार्डीकर यांच्या नेतृत्वात हिन्दुस्थानी सेविका दलाची स्थापना करण्यात आली. या दलाच्या कार्यात कमल व कुसुम सोहनी, बचुबाई वागळे, कृष्णा सरदेसाई, कावेरी चौधरी यांनी उल्लेखनिय कार्य केले. नगरला 'हिन्द सेविका संघा'ची स्थापना गांधीजींच्या विधायक कार्यात भाग घेयाच्या हेतूने जानकीबाई यांनी केली. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत प्रेमा कंटक, गोदाबाई परुळेकर यांनी विद्यार्थी दशेपासूनच सहभाग नोंदविला. १९४० सालच्या वैयक्तिक सत्याग्रहात महाराष्ट्रातील पहिली स्त्री-सत्याग्रही पद्मताई हरोलीकर ह्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. याबरोबरच कस्तुरबांच्या नेतृत्वाखाली ठाण्याजवळील कळवे येथे स्त्रियांना सहभागी करून घेऊन ठाण्यास सत्याग्रह करण्यात आला. त्यात यशोदाबाई कोतवाल, गंगुबाई मुळे, सुशिला ताम्हणे इत्यादी स्त्रिया सहभागी झाल्या होत्या.

**२) बंगाल प्रांत**

बंगाल प्रांतातून देखील स्वातंत्र्य चळवळीत महिलांनी महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला. सुभाषचंद्र बोस यांच्या सहकार्याने ललीता घोष या ऑक्सफर्ड मध्ये शिकलेल्या शिक्षीकेने १९२८ मध्ये महिला राष्ट्रीय संघाची स्थापना केली. याबरोबरच १९२९ साली कलकत्त्यातील स्त्रियांनी नारी सत्याग्रहाची स्थापना केली. त्यामध्ये उर्मिला देवी, ज्योतिर्मयी गांगुली, विमल प्रतिभादेवी सहभागी होत्या. यामधील स्त्रिया उच्चभ्रु बंगाली म्हणजेच ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य कुटुंबातील होत्या. तसेच ३० एप्रिलला चितगाव शस्त्रागाराच्या हल्ल्यात अनेक क्रांतीकारी महिलांनी सहभाग नोंदविला. मिदनापुर, चोविस परगणा, नौखाली आणि चितगाव येथील स्त्रियांनी मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला. अशाप्रकारे

बंगाल प्रांतातूनही उत्स्फुर्तपणे स्त्रियांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभाग नोंदविला.

**३) मद्रास प्रांत**

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात मद्रास प्रांतातील स्त्रियांनी देखील सक्रिय सहभाग नोंदविला. श्रीमती अंबुजमल ह्या एस.श्रीनिवासन आय्यंगार यांच्या मुलीने १९२८ साली स्त्रियांच्या स्वदेशी लिगची स्थापना केली. कृष्णाबाई राव ह्यांनी देशसेविका संघ स्थापन केला. याबरोबरच रुक्मिणी लक्ष्मीपती यांनी मिठाचा कायदा मांडला म्हणून १९३२ साली त्यांना कैद करण्यात आले. त्या मद्रास प्रांतातील पहिल्या स्त्री कैदी ठरल्या. त्यांना वेल्लोरच्या जेलमध्ये ठेवण्यात आले. १९३० च्या सत्यागृहात बेगम अब्दुल कादीर, वेदकुमारी, राधाकुमारी, बी.अमन, पार्वती देवी, लाडोराणी, तारादेवी, पुरणदेवी, शामदेवी या स्त्रियांनी देखील भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग नोंदविला असल्याचे दिसून येते.

**४) ओरीसा-आसाम प्रांत**

ओरीसा-आसाम मध्ये देखील महिलांनी भारतातील स्वातंत्र्यलढ्यात सहभाग नोंदविला. यात प्रामुख्याने रमादेवी चौधरी, नेपाळमधील सावित्रीदेवी यांनी ठिकठिकाणी दौरे काढून त्यांनी असहकार आणि विदेशी वस्तु वापरण्याविषयी जागृती केली. मध्य प्रांतातील स्त्रिया अनुसयाबाई काळे असहकार व बहिष्कारात अग्रभागी होत्या. या भागातील १९३०-३१ च्या सत्यागृह आंदोलनात जवळपास १ लाख लोकांना अटक झाली. त्यापैकी १७ हजार स्त्रिया होत्या. अनेकवेळा ब्रिटीशांनी कारागृहात जागा उपलब्ध नसल्यामुळे महिलांना कैद करून जंगलात सोडून देण्यात येत असे. या सत्यागृहातल अनेक महिलांनी लाठीमार व गोळीबाराचाही सामना केला. अशा प्रकारे आसाम-ओरिसा प्रांतातून देखील महिलांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला.

**समारोप**

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात पुरुष सत्यागृही प्रमाणे महिलांनी देखील सक्रिय सहभाग नोंदवून आपणस पुरुषापेक्षा कमी नाहीत हे दाखवून दिले. विशेषतः १८८५ नंतर स्त्रियांनी सहभाग नोंदविला. यास महात्मा गांधीजींच्या प्रेरणेतून आणखी वाढता पाठींबा प्राप्त झाला. गांधीजींच्या सत्यागृहात भारतातील शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातील स्त्रियांनीही सक्रिय सहभाग नोंदविला. त्यांनी ब्रिटीशांच्या समोर निदर्शने केली. त्यांनी ब्रिटीशांच्या अत्याचाराचा प्रखरपणे सामना केला. या स्त्रियांचे योगदान भारतास स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी साह्यभूत ठरले. स्त्रियांच्या स्वातंत्र्य लढ्यातील सहभागामुळेच भारतात खऱ्या अर्थाने राष्ट्रवादाची भावना उदयास आली, वाढीस लागली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. स्त्रियांच्या सहभागामुळेच ही चळवळ एक विशाल चळवळ बनली. याच प्रमुख कारणामुळे ब्रिटीशांना भारतातून घालवून देणे शक्य ठरले असल्याचे स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१) डॉ. पद्मजा पाटील व शोभना जाधव - भारतीय इतिहासातील स्त्रिया.
२) डॉ.निलम जैन - समाज निर्माण में महिलाओं का योगदान.
३) राधाकुमार - स्त्री संघर्ष का इतिहास.
४) भागवत कमल - स्त्री चळवळीची वाटचाल.
५) बा.अ. देशपांडे - महाराष्ट्राच्या कर्तृत्वशालीनी.
६) नंदीता गांधी, नंदीता शाह - स्त्री संघर्षाची नवी रूपे.

❑❑❑